MHTH010038922015

| | | |
|---|---|---|
| दाखल तारीख | : | २०.०५.२०१५ |
| नोंदणी तारीख | : | २०.०५.२०१५ |
| निकाल तारीख | : | २१.०६.२०२५ |
| कालावधी | : | १०व.०१म.०१दि. |

---

**अतिरिक्त सत्र न्यायाधीश ठाणे, यांचे न्यायालयात**
**( पिठासिन अधिकारी - ए.एस. भागवत)**

---

**सत्र खटला क्र.२५४/२०१५.**
**नि.क्र.३०.**

| | |
|---|---|
| अभियोग पक्ष | महाराष्ट्र सरकार तर्फे वर्तकनगर पोलीस ठाणे गु.र.क्र.९३/२०१५ |
| अभियोग पक्षातर्फे | सरकारी अभियोक्ता श्री. एस.डी.लोंढे |
| **आरोपी** | **मधु अर्जुन यादव,**<br>वय : ४७ वर्ष,<br>व्यवसाय : धंदा,<br>रा. ओमशांती सागर अपार्टमेंट,<br>लोकमान्यनगर, पाडा क्र.४,<br>तळमजला,<br>लोकमान्यपाडा न.४,<br>ठाणे. |
| आरोपी तर्फे | विधीज्ञ श्री. बी.एन.पांडे |

**भाग-'ब'**

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | १०.०२.२०१५ |
| गुन्हा दाखल तारीख | १०.०२.२०१५ |
| दोषारोपपत्र दाखल केल्याचा दिनांक | २०.०५.२०१५ |
| दोषारोप निश्चत केल्याचा दिनांक | २४.०९.२०२१ |
| साक्ष सुरू केल्याचा दिनांक | ०३.०४.२०२४ |
| न्यायनिर्णय राखीव ठेवल्याची तारीख | १६.०६.२०२५ |
| न्यायनिर्णय तारीख | २१.०६.२०२५ |

| | |
|---|---|
| शिक्षेचा आदेश असल्यास त्याची तारीख | ..... |

**आरोपींचा तपशील**

| आ. क्र. | आरोपीचे नांव | अटक दिनांक | जामिनावर सुटल्याचा दिनांक | आरोपी विरूध्द ठेवलेले दोषारोप | निर्दोष मुक्त किंवा शिक्षा | लादलेली शिक्षा | ताब्यात घालवलेला कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | मधु अर्जुन यादव | १०.०२.२०१५ | ९.०७.२०१५ | u/s.370(2) of IPC and Sections 3, 4, 5 of PITA Act. | निर्दोष | -- | -- |

**भाग–'ब'**

**अ. अभियोग पक्षातर्फे साक्षीदार :**

| क्र. | नांव | निशाणी | साक्षीदाराचे स्वरूप |
|---|---|---|---|
| सा.क्र.१ | शरद सदाशिव पंजे | ११ | फिर्यादी |
| सा.क्र.२ | नितीन नारायण मुणगेकर | १८ | पंच साक्षीदार |

**ब. बचाव पक्षाचे साक्षीदार :**

| क्र. | नांव | निशाणी | साक्षीदाराचे स्वरूप |
|---|---|---|---|
| | | | |

**अभियोग पक्षाची यादी/बचाव/न्यायालय निशाण्या.**

**अ. अभियोग पक्षातर्फे निशाण्याः**

| क्र. | निशाणी क्र. | वर्णन |
|---|---|---|
| १. | १२ | फिर्याद |
| २. | १३ | छापील एफ.आय.आर. |
| ३. | १९ | पंचनामा |
| ४. | २० | पंचनामा |
| ५. | २१ | नोटांच्या छायांकित प्रती |
| ६. | २२ | जप्त नोटा |
| ७. | २३, २४ | पाकीटे |

ब. बचाव पक्षातर्फे निशाण्याः

| क्र. | निशाणी क्र. | वर्णन |
|---|---|---|
| १. | | |

क. न्यायालय निशाण्या :

| क्र. | निशाणी क्र. | वर्णन |
|---|---|---|
| १. | ३ | आरोप |
| २. | ४ | आरोपीची जबानी |
| ३. | २९ | आरोपीचा फौ.प्र.सं. कलम ३१३ प्रमाणे जबाब |

ड. भौतिक वस्तू :

| क्र. | भौतिक वस्तू क्र. | वर्णन |
|---|---|---|
| १. | आर्टिकल ए | पाकीट |
| २. | आर्टिकल बी | जप्त नोटा |
| ३. | आर्टिकल सी | जप्त मोबाईल |
| ४. | आर्टिकल डी | कंडोम पाकीट |

# न्यायनिर्णय

( पारीत दिनांक २१ जून, २०२५ )

**(१)** आरोपी विरुध्द कलम ३७० (२) भारतीय दंड विधान सह कलम ३, ४, ५, अनैतिक व्यापार प्रतिबंध अधिनियम, प्रमाणे आरोप ठेवण्यात येवुन प्रकरण चालविण्यात आले. अभियोग पक्षाने दाखल केलेल्या प्रकरणाचा तपशिल पुढीलप्रमाणे :-

**(२)** अभियोग पक्षाचे असे आरोप आहेत की,

फिर्यादीस मिळालेल्या गुप्त माहिती नुसार आरोपी हया वेश्या व्यवसायासाठी मुली पुरवायच्या व्यवसायात असुन त्याप्रमाणे वरिष्ठाच्या आदेशानुसार कारवाई करीत असता बोगस ग्रिहाईकाने आरोपीस वेश्या व्यवसायासाठी मुली पुरविण्यास सांगितले असता त्यांनी तीन पिडित

महिलांना नामे हसिना राजू खान, अंजली गोपाळ मंडळ, गणिता गौतम गजभारे, यांना पैशाचा मोबदला स्विकारून वेश्या व्यवसायास दि.१०.०२.२०१५ रोजी रूम न.४, ओम शांती सागर अपार्टमेंट, लोकमान्य नगर पाडा नं.४,ठाणे येथे प्रवृत्त केले व कलम ३७० (२), भारतीय दंड विधान सह कलम ३, ४, ५, अनैतिक व्यापार प्रतिबंध अधिनियम, प्रमाणे गुन्हे केले. फिर्यादीच्या तक्रारीवरुन पोलिस तपास करण्यात आला. यात घटनास्थळी घटनास्थळ पंचनामा तयार केला, साक्षीदारांचे जाबजबाब नोंदविले. तसेच आरोपीं जवळुन पैसे, कंडोम, मोबाईल, ओळखपत्र, जप्त केले व इतर आवश्यक तपास करण्यात आला व तपासाअंती आरोपी विरुध्द भरपुर पुरावा मिळुन आल्याने, न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले.

**(३)** आरोपींने त्यांच्याविरूध्दचे आरोप फेटाळुन लावले व त्यांना खोटया प्रकरणात गोवल्याचे सांगितले.

**(४)** वरील बाबींवरून माझेसमक्ष खालीलप्रमाणे मुददे उपस्थित होतात, त्यास मी पुढील नमुद कारणाप्रमाणे उत्तरे देतो.

| | **मुद्दे** | | **निष्कर्ष** |
|---|---|---|---|
| १. | अभियोग पक्षाने हे सिध्द केले काय की, फिर्यादीस मिळालेल्या गुप्त माहिती नुसार आरोपी हे वेश्या व्यवसायासाठी मुली पुरवायच्या व्यवसायात असुन त्याप्रमाणे वरिष्ठाच्या आदेशानुसार कारवाई करीत असता बोगस ग्रिहाईकाने आरोपी यांस वेश्या व्यवसायासाठी मुली पुरविण्यास सांगितले | .. | नकारार्थी. |

| | | | |
|---|---|---|---|
| | असता त्यांनी तीन पिडित महिलांना नामे हसिना राजू खान, अंजली गोपाळ मंडळ, गणिता गौतम गजभारे, पैशाचा मोबदला स्विकारून वेश्या व्यवसायास दि.१०.०२.२०१५ रोजी रूम न.४, ओम शांती सागर अपार्टमेंट, लोकमान्य नगर पाडा नं.४,ठाणे येथे प्रवृत्त केले व कलम ३७० (२), भारतीय दंड विधान सह कलम ३, ४, ५, अनैतिक व्यापार प्रतिबंध अधिनियम, प्रमाणे गुन्हे केले ? | | |
| २. | आदेश काय ? | .. | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## का र ण मि मां सा

**मुद्दा क्रमांक १ व २ करीता :-**

(५) अभियोग पक्षातर्फे दोन साक्षीदार तपासण्यात आले. साक्षीदार क्र.१ फिर्यादी पीएसआय शरद सदाशिव पंजे असुन यांनी घटनेविषयी साक्ष दिली की "सन २०१५ साली मी एएचटीसी, गुन्हे शाखा, ठाणे येथे पीएसआय पदी कार्यरत असता, रेस्क्यु फांउडेशन अधिकारी नितीन मुणगेकर यांनी व वपोनि शेख यास बातमी दिली की, मधू यादव नामक महिला ओम शांती सागर अर्पा., लोकमान्यनगर ठाणे या ठिकाणी महिलांना कामास ठेवुन त्यांचे कडून शरीरविक्रीचा व्यवसाय करित आहे व दि.१०.०२.२०२५ रोजी वपोनि शेख यांनी मला पीएसआय विधाते व इतर पोलीस कर्मचारी यास बोलावून कळविले व वरिष्ठांच्या आदेशानुसार कार्यवाही करावी असा आदेश दिला.

वपोनि शेख यांनी  नितीन मुणगेकर, वैशाली डोईफोडे यास बोलावून पंच म्हणून राहण्यास विनंती केली असता त्यांनी संमती दिली व प्रकाश कुमार साव यास बनावट ग्राहक म्हणून राहण्यास विनंती केली असता त्यांनी संमती दिली व तसेच त्यांना गुप्त बातमी कार्यवाहीची रूपरेषा समजावून सांगितली त्यानंतर वपोनि शेख यांनाी बनावट ग्राहकास मधूला तिथे जाउन संपर्क करण्यास सांगितले व शररविक्रीचा मागणी करण्याची सुचना दिली व तसेच त्याचा मोबदला म्हणून रूपये ५००/- च्या तीन नोटा त्यापुर्वी त्याच्या छायांकित प्रती काढून बनावट ग्राहकास दिल्या व  प्रतिवर पंच, तपास अधिकारी यांनी सहया केल्या व त्यानंतर आम्ही सर्व पो. कर्मचारी, पंच, बनावट ग्राहक, स्टेशन डायरीत नोद करून सरकारी वाहनाने वरील ठिकाणी निघालो व ओम शांती सागर अर्पाटमेंट जवळ गाडी थांबवून बनावट ग्राहक, पंचाना सुचना दिल्या व इशारा म्हणून बनावट ग्राहकास पंच मुणगेकर यांचा मोबाईलवर मिस कॉल देण्यास सांगितले त्यानंतर बनावट ग्राहक ओम शांती सागर अपार्टमेंट मध्ये गेला व सुमारे २० मिनिटांनी त्याचा मिस कॉल पंच मुणगेकर यास आल्यावरून आम्ही सर्व पोलीस कर्मचारी, पंच ओम शांती सागर अपार्टमेंट, रूम नं. ४ येथे गेलो व दरवाजा उघडल्यावरून मधू हिस आमची ओळख दिली व आमची अंगझडती घेण्यास सांगितले असता तिने नकार दिला व तिने आपले नाव मधू अर्जुन यादव असे सांगितले व तिथे दोन महिला चटई वर बसल्या होत्या व त्यांची नांवे अंजली मंडल, गणिता गजभारे, असे निष्पन्न झाले. त्यानंतर मधु हिस बनावट ग्राहकाविषयी विचारले असता तो बंद खोलीत आहे असे सांगितले व तिथे वपोनि शेख, पंच गेले व दरवाजा उघडला व तिथे बनावट ग्राहक, एक महिला हजर दिसली व महिला पोलिसांनी तिचे नाव, गाव विचारले असतो तिने हसिना खान सांगितले व त्यानंतर बनावट ग्राहकास दिलेल्या नोटाबाबत विचारले असता त्याने त्या मधू यादव हिला दिल्याचे सांगितले. त्यानंतर महिला पोलीसांनी मधू यादव हिची अंगझाडती घेतल्या

नंतर तिचे पर्स मधून रूपये ७,७००/- मिळून आले. त्यात वरील तीन नोटा होत्या. तसेच बनावट ग्राहक असलेल्या खोलीची झडती घेतली असता बेडच्या गादी खाली एकूण ७ कंडोम पाकीटे मिळून आली, त्यानंतर सदर सात हजर सातशे, मोबाईल फोन, कंडोम पाकीटे पंचासमक्ष जप्त करून पंचनामा केला त्यानंतर आम्ही सर्व पो. कर्मचारी, पंच, बनावट ग्राहक, आरोपी, पिडीत, असे सर्व मिळुन वर्तक नगर पोलीस स्टेशन येथे आलो. जिथे मी घटनेबाबत फिर्याद दिली ज्यावर माझी सही असून मजकूर खरा आहे व फिर्याद नि.क्र. १२ वर आहे. छापील एआयआर वर माझी सही असून त्यातील मजकूर खरा आहे व तो नि. १३ वर आहे."

**(६)** उलट तपासांत साक्षीदार क्र.१ ने साक्ष दिली आहे की, " मला माहिती नाही की वपोनि शेख यांनी गुप्त बातमी रजिस्टर मध्ये नोंद केली आहे किंवा नाही. एएचटीसी ऑफीस शेजारी खंडणी विरोधी पथक, दोन, तीन गुन्हे शाखा कार्यालय आहे. पंच मुणगेकर एएचटीसी कार्यालयात दुपारी आले होते. मात्र नेमकी वेळ सांगु शकत नाही. दिल्याप्रमाणे कुठलीही घटना घडली नाही. त्यांचे सोबत दुसरे पंच वैशाली डोईफोडे आल्या होत्या. आम्हाला पीएसआय विधाते यांना वपोनि शेख यांनी दुपारी ४.०० वाजता त्यांच्या कार्यालयात बोलाविले व पाच मिनीटात गुप्त माहितीबाबत सांगितले व त्यावेळेस रेड पथकाचे सर्व सदस्य हजर होते. बनावट ग्राहकांस पो.ना. पवार यांनी बोलावले होते. त्याने कसे बोलावले हे मला माहिती नाही. हायपर सिटी मॉल ते एएचटीसी कार्यालय सुमारे अडीच किलोमीटर आहे. मला माहिती नाही की बनावट ग्राहक एएचटीसी कार्यालयात किती वाजता आला. बनावट ग्राहक मिटींग मध्ये हजर होता. मिटींग साडेचार वाजता संपली. एएचटीसी येथे स्वतंत्र पोलीस स्टेशन नाही व तिथे सरकारी आवक जावक यंत्रणा आहे व शासनाकडून निधी मिळतो. या प्रकरणातील तीन पाचशेच्या नोटा मिळतो. या प्रकरणातील तीन पाचशेच्या नोटा वपोनि शेख

यांनी बनावट ग्राहकास दिल्या होत्या व तात्पुरते स्वत:जवळच्या नोटा दिल्या होत्या व त्याची नोंद स्टेशन डायरीमध्ये घेतली गेली होती. मी यापूर्वी वर्तकनगर पोलीस स्टेशन अधिकारी होतो व त्या संपूर्ण भागाची मला माहिती आहे. हे खरे नाही की वर्तकनगर पो. स्टे.च्या हददीत एल.एम. नगर नाही. पाडा नं. ४च्या आजूबाजूस बिल्डींग, दुकाने आहेत. शेवटच्या बिल्डींग मध्ये आम्ही रेड कामी गेलो होतो व मला माहिती नाही की पाडा नं.४ बस स्टॉपचे किती बिल्डींग सोडुन असलेल्या बिल्डींगमध्ये आम्ही रेड कामी गेलो होतो. आम्ही रेड कामी गेलेल्या फ्लॅटचे शेजारील फ्लॅट धारकाचे नांव मी सांगू शकत नाही. रेड करताना आजूबाजूकडील लोकांना सुचना दिली नव्हती. खाजगी वाहनाचा नंबर मी सांगु शकत नाही. कोणकोण खाजगी वाहनाने गेले हे मी सांगु शकत नाही. आम्ही घटना स्थळावर १७. १५ वाजता पोहचलो. बनावट ग्राहकाने, पंच मुणगेकर यास किती वाजता इशारा दिला हे मी सांगु शकत नाही. मी बनावट ग्राहकास त्याने किती वाजता सांकेतिक इशारा दिला याबददल विचारले नाही. हे खरे नाही की आम्ही रेड पार्टी सोबत ओमशांती सागर अपार्टमेंट गेलो नाही व त्या इमारतीच्या मजल्यावर किती फ्लॅट आहे हे मी सांगु शकत नाही. हे खरे नाही की वपोनि शेख यांनी दरवाजा ठोठावल्यावर आरोपीने दरवाजा उघ-डला नव्हता. हे खरे नाही की आरोपीने तिचे नांव मधु सांगितले व तिला अंगझडती घेण्यास सांगितले असता तिने नकार दिला. घरामधील महिलांना अंगझडती घेण्याचे सांगितले नाही. हे खरे नाही की मी खोटे सांगत आहे की आरोपीस बनावट ग्राहकाविषयी विचारले असता तिने बेडरूम मध्ये असल्याचे सांगितले व तिथे बनावट ग्राहकाने दरवाला उघडला व पिडीत मिळुन आली. जप्त रूपये सात हजार सातशे नोटा क्रमांक फिर्याद मध्ये नमुद नाही व त्या किती दराच्या होत्या ते मी सांगु शकत नाही. हे खरे नाही की कंडोम पाकिटे मिळुन आले नाही. हे खरे नाही की संध्याकाळी ६.३० वाजता एएचटीसी कर्मचारी यांनी आरोपीस तिच्या नव-याचा अपघात

झाल्याचा बहाणा करून एएचटीसी कार्यालयात बोलावले व तिने रस्त्यात नव-याच्या तब्येती विषयी विचारले असता उडवाउडवीची उत्तरे दिली व सर्व पिडीता माहिती घेण्यासाठी एएचटीसी कार्यालयात आल्या होत्या व तिथे त्यांना पिडीता म्हणुन बसवुन घेतले. मी फ्लॅटचे एकुण किती क्षेत्रफळ सांगु शत नाही व तो किती बीएचकेचा होता हे मी सांगु शकत नाही व त्याचे आजुबाजुस कुठली बिल्डींग होती हे मी सांगु शकत नाही. हे खरे नाही की आरोपीच्या ताब्यातुन काहीही जप्त करण्यात आले नव्हते. हे खरे नाही की पंच मुणगेकर एएचटीसीचा जवळचा व्यक्ती आहे व वैशाली डोईफोडे त्यांचे सहकारी आहेत व ते आमचे नेहमीचे पंच आहेत. हे खरे नाही की मी खोटी फिर्याद दिली होती व आज खोटी साक्ष देत आहे."

(७) साक्षीदार क्र.२ पंच नितीन नारायण मुणगेकर यांनी साक्ष दिली आहे की, "दिनांक १०/०२/२०१५ रोजी मला ए.एच.टी.सी. चे व.पो. नि. यांनी मला कार्यालयात बोलावले होते व त्यांना खात्रीलायक बातमी मिळाली होती की, मधु यादव नावाची महिला रूम न.४ शांतीसागर अपार्टमेंट, वर्तकनगर पो.स्टे. येथे राहत्या घरामध्ये ठेवले होत व वेश्याव्यवसाय करवीत होती व त्यांनी वरिष्ठांच्या आदेशानुसार कारवाई करण्याचे ठरवले होते व त्यानंतर व.पो.नि. यांनी पोलिस शिपायास बोगस ग्रिहाईक आणला व त्यास बातमी समजावून सांगितली. त्यावेळेस दुसरे पंच वैशाली हजर होती. त्यानंतर व.पो.नि. यांनी पंच, बनावट ग्रिहाईकांस सुचना दिल्या व बनावट ग्रिहाईकाचे नांव प्रकाश साहू असे होते. व त्यांची आमच्यासी ओळख करुन दिली. बोगस ग्राहक बनण्यास संमती दिली होती. त्यानंतर व.पो.नि. यांनी रेड पार्टी तयार केली व आम्हासर्वांना सुचना दिल्या तसेच रू.५००/- च्या तीन नोटा बोगस ग्रिहाराईकांस आरोपी मधु यादव हिला देण्यासाठी दिल्या. पंचनाम्यामध्ये नोटांचे नंबर नमुद आहेत व त्यावेळेस नोटांची झेरॉक्स काढून त्यावर पंचाच्या सहया घेतल्या.

त्यानंतर पंचनामा तयार करण्यात आला. प्रिरेड पंचनाम्यावर माझी, दुसरे पंच, तपास अधिकार यांनी सही असून **नि.१९** वर आहे. त्यानंतर सरकारी वाहन, मोटरसायकल, खाजगी वाहन यांने पंच, पोलिस स्आफ बोगस गि–हायक ओम शांती सागर अपा. येथे जाण्यास निघाले. व संध्याकाळी ०५. १५ ला पोहचललो. तेथे बोगस गि–हायक अपा. गेला व थोडयावेळाने त्याने माझया मोबाईल वर तो तेथे पोहचल्याचे सांगितले. व ते मी व.पो. नि.शेख यांना सांगितले व त्यावेळेस आम्ही पंच बिल्डीगच्या आजूबाजूस दबा धरूनबसलो होतो. त्यानंतर आम्ही सर्व अपा. मध्ये गेलो. व तेथील रु.४ तळमजल्ला येथे पोहचलो व व.पो.नि. यांनी प्लॅटचा दरवाजा ठोठावला असता एका महिलेने दार उघडले व तिला मिळालेली बातमी बाबत सांगितले असता व अंगझडती घेण्याबाबत विचारले असता तिने नकार दिला व तेथे येण्याचा उददेश तिला समजावून सांगितला व आत मध्ये प्रवेश केला असता दोन महिला दिसून आल्या व व.पो.नि. यांनी मधु यादव कोण आहे असे विचारल्यावरून एक महिलेने हो म्हटले व तिने संपूर्ण पत्ता सांगितला व तिला बोगस ग्रिहाईकाबाबत विचारले असता तिने तो आत मधल्या खोलीत असल्याचे सांगितले. सदरचे दोन महिलांना महिला पो.शिपायांनी चौकशी केली असता. अंजली गौपाळ मंडळ वय २६ व दुसरीने गणिता गौतम गजभारे असे सांगितले. त्यानंतर महिला पो.शि. अधिकारी यांनी आतमधील खोलीचा दरवाजा ठोठावला असता बोगस ग्रिहाईकाने दरवाजा उघडला व खोलीत एक महिला बेडवर बसलेली दिसली. त्या महिलेला महिला पो.शिपाई हीने खोली बाहेर आणले व चौकशी केली असता तिने तिचे नांव हसिना खान, रा.कळवा असे सांगितले. व अधिक चौकशी केली असता तिने माझी आर्थीक परिस्थिती खराब आहे असे सांगितले. व तिच्या कडून आरोपी मधु यादव वेश्याव्यवसाय करवते व त्याबदल्यात तिला रू.३०० देते असे सांगितले व इतर दोन पिडीत महिलांना विचारले असता त्यांनी देखील हसिना प्रमाणे माहिती दिली व बेडरूमची पाहणी केली असता सात कंडोम

पाकीट मिळून आले व आरोपी मधु यादव हीला बोगस ग्रिहाईकाने दिलेल्या पैश्याबाबत विचारले असता तिने पर्स मध्ये ठेवले असे सांगितले व पर्सची पाहणी केली असता रू. ७,७००/- व मोबाईल मिळून आला व त्यांत रू. ५०० च्या अकरा व रू.१०० च्या २२ नोटा होत्या. त्यानंतर तपास अधिका-यांनी मुददेमाल ताब्यात घेतला व वेगवेगळया पाकीटात सिलबंद केला.बेडरूम आठ बाय सात फुट मापाचा होता व त्यात कपाटे होती. घरात घरगुती वस्तू होत्या. व त्या बाबत पंचनामा केला वर त्यावर माझी सही असुन मजकूर खरा आहे त्याला **नि.२०** देण्यात येतो. नोटांच्या झेरॉक्सवर माझी सही त्या **नि. २१** वर आहेत. जप्त मुददेमाल दाखवल्यास मी ओळखु शकेल. जप्त नोटा रू.१५००/ **आर्टीकल ए** त्यांचे पाकीट **नि.२२** देण्यात येतो. जप्त नोटा रू.६,२०० **आर्टीकल बी** व जप्त मोबाई **आर्टीकल सी**. ला आहे व त्यांचे पाकीट **नि.२३,** जप्त कंडोम सात पाकीटे **आर्टिकल डी** त्यांचे पाकीट **नि.२४** मी आरोपीला ओळखतो ती आज कोर्टामध्ये हजर आहे."

**(८)** उलट तपासांत साक्षीदार क्र.२ ने साक्ष दिली आहे की, "आज रोजी मी ५२ वर्षाचा आहे. मी मागील १६ ते १७ वर्षापासून रेसक्यु फाउंडेशन येथे काम करतो. व तेथून मला पगार मिळतो. आज रोजी रेसक्यु फाउंडेशन मध्ये मी काम करत असल्याचा कागदोपत्री पुरावा मी कोर्टात आणला नाही. मला १०/०२/२०१५ रोजी व.पो.नि.शेख यांनी दुपारी ४ वाजता कार्यालयात बोलावले होते. हे खरे नाही की, याआधी माझी व त्यांनी भेट झाली होती. हे खरे नाही की, मी यापूर्वी, ए.एच.सी. टी.कार्यालयामध्ये काम केले आहे. मी ब-याच केसेस मध्ये मागील १६ ते १७ वर्षात पंच म्हणुन काम केले आहे."

**(९)** सरकार पक्षाने वारंवार साक्ष समन्स काढुन देखील इतर

कुठलेही साक्षीदार तपासले नाहीत. साक्षीदार यादीतील साक्षीदार क्र. ४ ते ६ ज्या तीन पिडित महिला नामे हसिना राजू खान, अंजली गोपाळ मंडळ, गणिता गौतम गजभारे, आहेत ते साक्ष समन्स रिपोर्ट नि. २७ प्रमाणे बेपत्ता ( Not traceable) आहेत. साक्षीदार यादीतील साक्षीदार क्र. ७ जे बनावट ग्रिहाईक आहेत त्यास सरकार पक्ष तपासण्यात अपयशी ठरलेला आहे. तपास अधिका–यांस साक्ष समन्स रिपोर्ट नि. २८ प्रमाणे साक्ष समन्सची बजावणी होवुन देखील ते साक्ष देण्यास हजर झाले नाही व त्याप्रमाणे आदेश नि.१ दिनांक ३०.०१.२०२५ नुसार प्रकरण आरोपी जबाब फौ.प्र.सं कलम ३१३ साठी नेमण्यात आले.

**(१०)** वरील साक्षीवरून निष्पन्न होते की साक्षीदार क्र.१, २ यांच्या साक्षीस कुठल्याही इतर साक्षीदाराचा आधार नाही त्यामुळे तिचे पुष्टीकरण झाले नाही. महत्वाचे म्हणजे पिडीत साक्षीदार, बनावट ग्रिहाईक, यांना सरकार पक्षाने तपासले नाही व समन्स रिपोर्ट नि. २७ अनुसार ते बेपत्ता ( Not traceable) आहेत. आरोपी विरूध्दचा हा खटला सुमारे दहा वर्षापासुन प्रलंबित आहे. वरील परिस्थीतीत आरोपी विरूध्द कुठलाही सबळ पुरावा मिळुन येत नाही. सरकार पक्षाचे इतर साक्षीदारांना त्यानंतर वारंवार समन्स काढून देखील सरकारपक्षाने इतर एकही साक्षीदार तपासले नाही व त्याबाबत आदेश निशाणी दि. ३०.०१.२०२५ चे पालन करू शकले नाही व त्यामुळे प्रकरण बंद करण्यात आले. सरकार पक्षाने इतर साक्षीदार तपासले नाही. आरोपींविरुध्द कुठलाही पुरावा नाही व त्यामुळे सरकार पक्ष आरोपी विरुध्द कलम ३७० (२) भारतीय दंड विधान सह कलम ३, ४, ५, अनैतिक व्यापार प्रतिबंध अधिनियम, कायदयाच्या आरोपातुन गुन्हा संशयापलिकडे सिध्द करण्यास अपयशी ठरला आहे व संशयाचा फायदा आरोपीला मिळतो.

**(११)** या परिस्थीतीत अभियोग पक्ष आरोपींविरूध्द कुठल्याही प्रकारचे आरोप सिध्द करू शकले नाही. त्यामुळे मी मुद्दा क्रमांक १ यास नकारार्थी असे उत्तर देतो. वरील प्रमाणे आरोपी विरुध्द ठेवलेले आरोप सिध्द होत नसल्याने सदर आरोपी या प्रकरणातून निर्दोष मुक्त होण्यास पात्र ठरतात. त्यामुळे मुददा क्रमांक २ करीता, मी खालील आदेश पारीत करतो :-

## आदेश

१. आरोपी मधु अर्जुन यादव यांची कलम २३५ (१) फौजदारी प्रक्रिया संहीता नुसार कलम **३७० (२) भारतीय दंड विधान सह कलम ३, ४, ५, अनैतिक व्यापार प्रतिबंध अधिनियम,** कायदयाच्या आरोपांतुन निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. आरोपी चे जामीनपत्र व वैयक्तीक जामिनबंध पत्र रदद करण्यात येते.

३. आरोपीने पुढील प्रस्तावित अपीलाचे कालावधीसाठी कलम ४३७-अ फौजदारी प्रक्रिया संहीता नुसार रुपये १५,०००/- (रुपये पंधरा हजार मात्र) चे वैयक्तिक जामिनबंध पत्र द्यावे.

४. जप्त मुद्देमाल - १. रू.१५००/-, २. रू.६,२००/-, अपिल कालावधीनंतर सरकार जमा करण्यात यावेत. जप्त मुददेमाल सॅमसंग कंपनीचा मोबाईल फोन त्याच्या मुळ मालकांस अपिल कालावधीनंतर परत करण्यात यावीत. इतर जप्त मुददेमाल मुल्यहिन असल्याने अपिल कालावधीनंतर नष्ट करण्यात यावा.

निकाल खुल्या न्यायकक्षात घोषित करण्यात आला.

ASHUTOSH SUDHAKARRAO BHAGWAT

Digitally signed by ASHUTOSH SUDHAKARRAO BHAGWAT
Date: 2025.06.21 16:07:22 +0530

ठाणे.
दिनांक : २१.०६.२०२५

( ए.एस.भागवत )
अतिरिक्त सत्र न्यायाधीश, ठाणे.